

# -: संत श्री. गोरा कुंभार :-

महाराष्ट्र ही संतांची भूमी म्हणून ओळखली जाते. अशाच संतांमध्ये एक ज्येष्ठ संत म्हणजे "संत गोरा कुंभार". यांचा जन्म इ.स. १२६७ मध्ये झाला. त्यांचे जन्मस्थान "धाराशिव" जिल्ह्यातील 'तेरढोक' हे गाव होय. तेरणा नदीच्या तीरावर हे गाव वसलेलं आहे. त्यांच्या वडिलांचे नाव "माधवबुवा" व आईचे नाव "रखुमाई" असे होते. त्यांचे घराणे हे 'तेर' या ग्रामातील काळेश्वर या ग्रामदेवतेचे उपासक होत. माधवबुवांची सगळी मुले ही देवाघरी जात असत. आठही मुलांपैकी एकही मुलगा जिवंत न राहिल्याने त्यांनी 'काळेश्वरां'ची आराधना केली. तेव्हा भगवंत प्रसन्न होऊन म्हणाले 'गोरीत गाढलेल्या मुलांना काढ'. त्या आठ मुलांपैकी आठवा मुलगा जो स्वर्गाकडे निघाला होता त्याला भगवंतांनी थांबविले आणि परत आणून जीवदान दिले. हेच ते संत गोरोबा. गोरीतून काढले म्हणून त्यांचे नाव 'गोरोबा' असे ठेवले गेले. संत गोरोबा हे ज्ञानेश्वर महाराजांच्या समकालीन होते. इतर सर्व संतांमध्ये गोरोबा ज्येष्ठ व वडील असल्याने त्यांना काका ही उपाधी सर्व संतांनी बहाल केली.

स्वतःचा परंपरागत कुंभार व्यवसाय करीत, प्रपंच सांभाळून त्यांनी भागवत धर्माचा प्रचार केला. 'आलेला प्रत्येक दिवस ईश्वराला स्मरून, काळ सार्थकी लावणारा तोच खरा वारकरी', अशी त्यांची धारणा होती. ते स्वतः ईश्वर भक्तीत तल्लीन होऊन स्वतःची दिनचर्या पाळत. भगवंताचे अखंड नामस्मरण आणि भजन हाच त्यांचा साधना मार्ग होता. विठ्ठल

नामाचा लळा गोरोबा काकांना इतका लागला होता की, विठुरायाच्या नामस्मरणात तल्लीन होऊन पायाखालची माती तुडवताना त्यांना आपल्या लहान बाळाचे ही भान उरले नाही. त्या चिखलात आपल्या बाळालाही तुडवले ही गोष्ट सर्वांना ज्ञात आहे. त्याच बाळाचे नाव “मकरेंद्र” होते.

संत गोरा कुंभार यांची पहिली पत्नी संती व दुसरी पत्नी रामी होय. आपले मूल पायतळी तुडवले गेल्याने क्रोधीत झालेल्या संतीने गोरोबांना आपणास हात न लावण्याची विठोबाची शपथ घातली. त्यानंतर गोरोबा अधिकच विरक्त झाले. काही दिवसांनी गोरोबा आपली शपथ कधीही मोडणार नाहीत, हे लक्षात आल्याने संतीने त्यांना रामीशी विवाह करण्यास सांगितले. पण गोरोबा संतीशी जसा अलिप्तपणे संसार केला तसाच रामीशी करणार, हे ठामपणे सांगितले, ते पाळले. संती आणि रामी या दोघांनी जाणून बुजून एका रात्री गोरोबांचे हात आपल्या देहावर ठेवून घेतले तेव्हा जाग आल्यानंतर विठोबाची शपथ आपणाकडून मोडली गेली, या भावनेने दुखी होऊन गोरोबांनी आपले दोन्ही हात, जे त्यांच्या व्यवसायासाठी अत्यंत महत्त्वाचे होते, तेच हात तोडून टाकले. असे हे विठ्ठलाचे निस्सीम भक्त होते. म्हणूनच याच निस्सीम भक्तासाठी स्वतः विठ्ठल, रुक्मिणी आणि गरुड वेष बदलून गोरा कुंभारांच्या घरी येऊन त्यांना मदत केली. अत्यंत वैराग्यपूर्ण वृत्ती व निर्गुणाबद्दल प्रेम हे संत गोरोबा काकांचे वैशिष्ट्य आहे. त्याबद्दल नामदेवांना सांगताना एक अभंग आहे.

निर्गुणाचा संग धरिला जो आवडी ।

तेणें केलें देशधडी आपणासी ।। १ ।।

अनेकत्व नेलें अनेकत्व नेलें ।

एकलें सांडिलें निरंजनीं ।। २ ।।

एकत्व पाहतां अवघेंचि लटिकें ।

जें पाहें तितुकें रूप तुझें ।। ३ ।।

म्हणे गोरा कुंभार ऐका नामदेव ।

तुम्हा आम्हा नांव कैचे कोण ।। ४ ।।

संत गोरा कुंभार यांनी २३ अभंगांची रचना केली. त्यापैकी २० अभंग सध्या उपलब्ध आहेत. संत गोरा कुंभार व नामदेव हे समकालीन संत असल्याने नामदेवांनी गोरोबाबंवर २० अभंग रचिले. गोरोबा काकांच्या अभंगांची संख्या कमी असली तरी त्यांच्या अभंग वाणीतून उत्कट भक्तीचा अनुभव येतो. गोरोबांच्या विठ्ठल भक्ती बद्दल लिहिताना नामदेव म्हणतात.

‘प्रेमे अंगी सदा वाचे भगवंत । प्रेमळ तो भक्त गोरा कुंभार ।

निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर , मुक्ताबाई अशा संतांचा विरह गोरोबा काकांना सहन झाला नाही. संत संगती शिवाय जीवन व्यर्थ वाटू लागल्याने गोरोबा काकांनी २० एप्रिल १३१७ रोजी 'तेरढोक’ या गावी समाधी घेतली.

- डॉ. शिवलीला नितीन पाटील.

व्यक्तिरेखा -

१. विठ्ठल - श्री. सुर्यकांत कुलकर्णी.
२. संत गोरा कुंभार - श्री. गिरीश कुलकर्णी.

नेपथ्य -

१. श्री. शंतनू देशमुख.
२. श्री. अद्वैय मुंढे.
३. श्री. के. एन. देसाई सर.
४. श्री. आमित पाटील.
५. श्री. महेश पुजारी.
६. श्री. ओमकार पाटील.
७. श्री. गिरीश कुलकर्णी.
८. श्री. सर्वेश उमराणी.
९. सौ. रिद्धी नलवडे.
१०. श्री. प्रशांत मुंढेकर.

लोकेशन -

श्री. संभाजी कुंभार यांचे रहाते घर, पाचवड फाटा, कराड.

रंगभूषा -

श्री. गणेश सावंत.

वेशभूषा -

१. सौ. आसावरी पंडित.
२. श्री. गणेश सावंत.

छायाचित्रण -

श्री. कल्पेश पाटसकर.

लायटिंग विभाग -

१. श्री. शंतनू देशमुख.
२. श्री. अद्वैय मुंढे.
३. श्री. आमित पाटील.
४. श्री. महेश पुजारी.
५. श्री. ओमकार पाटील.
६. श्री. सर्वेश उमराणी.
७. श्री. गणेश सावंत.

फोटो एडिटिंग -

१. श्री. राजेंद्र बिळासकार.

चित्र (स्केच) -

१. अद्वैय मुंढे.

लेखन विभाग -

- लेखन विभाग प्रमुख - श्री. राजेंद्र आलोणे.
- लेखन -

  डॉ. शिवलीला नितीन पाटील.

- लेख संकलन -

  श्री. दीपक आफळे.

- ध्वनीमुद्रण - सौ. स्वप्नजा बर्वे.
- ध्वनिमुद्रिका -